# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

**वार्षिकांक स्पर्धेतील पारितोषिकांची घोषणा**

**व्यावसायिक व बिगर व्यावसायिक गटातील महाविद्यालयांचा १ मे रोजी कुलगुरुंच्या हस्ते सत्कार**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने दरवर्षी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाद्वारे प्रकाशित वार्षिकांक स्पर्धा घेण्यात येते. २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रकाशित वार्षिकांकाची घोषणा करण्यात आली.

शहरी विभागांतर्गत बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीच्या 'प्रतिभा' या वार्षिकांकास, द्वितीय क्रमांक भारतीय महाविद्यालय, अमरावतीच्या 'भारती' या वार्षिकांकास व तृतीय क्रमांक भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाड्याच्या 'सुगंध' या वार्षिकांकास घोषित करण्यात आला आहे. व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक श्री.ह.व्या.प्र.मं.चे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीच्या 'टेक्नोविंग-२०१७' या वार्षिकांकास, द्वितीय क्रमांक प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेराच्या 'टेक्नोस्ट्रीम-२०१७' या वार्षिकांकास व तृतीय क्रमांक सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीच्या 'इनोव्हेटर-२०१७' या वार्षिकांकास घोषित करण्यात आला आहे.

ग्रामीण विभागांतर्गत बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक कला महाविद्यालय, मलकापूर, अकोलाच्या 'ज्ञानसाधना' या वार्षिकांकास, द्वितीय क्रमांक आदर्श विज्ञान, ज.भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगांव रेल्वेच्या 'गुलमोहोर' या वार्षिकांकास व तृतीय क्रमांक श्री वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणीच्या 'ज्ञानदीप' आणि कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबच्या 'अंतरंग' या वार्षिकांकास घोषित करण्यात आला आहे. व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक अनुराधा इंजिनिअरींग कॉलेज, चिखलीच्या 'अनुरंग-२०१७' या वार्षिकांकास व द्वितीय क्रमांक डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, अमरावतीच्या 'टेक्नोरिदम-२०१७' या वार्षिकांकास घोषित करण्यात आला असून पारितोषिक देवून महाविद्यालयांना सन्मानित केल्या जाणार आहे.

संबंधित पारितोषिके प्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी दि. १ मे, २०१८ रोजी सकाळी ७.३० वाजता विद्यापीठाच्या डॉ.के.जी.देशमुख सभागृहामध्ये आयोजित सत्कार समारंभाला उपस्थित राहावयाचे आहे. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावयाची असून पारितोषिके प्राप्त महाविद्यालयांचे प्राचार्य आणि त्या ठिकाणी कार्यरत सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर व कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. २५/०४/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**

जनसंपर्क अधिकारी